**वाचा**:-१) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील शासन निर्णय रा.भू.अ. २०१३ / प्र. क्र.२/ल-१ महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई ३२,दिनांक ०४/०१/२०१३

२)महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.रा.भू.अ.२०१३ / प्र.क्र.३२/ल-१ महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई ३२,दिनांक २३/०१/२०१३

३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं रा.भु.अ.आ.का-४/युनिकोड रुपांतरण /प्र.क्र.१५ /२०१२ दि.१५/०३/२०१३

४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.प्र.क्र.रा.भु.अ.आ.का-४/डेटा दुरुस्ती आज्ञावली /प्र.क्र.१६ /२०१२ दि.२०/०५/२०१३

---

क्र./रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र. २०/
म्युटेशन अपडेशन मॉड्युल /२०१३
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख( महाराष्ट्र राज्य ),पुणे
यांचे कार्यालय ,पुणे.
दिनांक १७/०६/२०१३

17 JUN 2013

# परिपत्रक

**विषय :- हस्तलिखीत फेरफार नोंदवहीतील मंजुर / नामंजुर नोंदी संगणकात घेण्यासाठी " म्युटेशन अपडेशन मॉड्युल " युनिकोड रुपांतरीत ७/१२ चा डेटा अद्यावत करण्याबाबतची प्रणाली**

ई-महाभुमि तथा राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकिकरण कार्यक्रम अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, पुणे यांनी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांचे मार्फत गाव नमुन्यांचे संगणकीकरण करण्यासाठी ई-चावडी आज्ञावली व अधीकार अभिलेखातील फेरफार प्रक्रियेचे संगणकीकरण करण्यासाठी ई-फेरफार आज्ञावली विकसीत केली आहे.महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे कडील शासन निर्णय रा.भू.अ. २०१३ / प्र. क्र.२/ल-१ ,दिनांक ०४/०१/२०१३ व शासन निर्णय क्र.रा.भू.अ. २०१३/प्र.क्र.३२/ल-१,दिनांक २३/०१/२०१३ अन्वये ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींची संपुर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावलींच्या अंमलबजावणीसाठी संगणकीकृत ७/१२ चा युनिकोड रुपांतरित अद्यावत डाटा वापरावयाचा आहे.केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्यातील सर्व ७/१२ चे संगणकीकरण करण्यात आलेले आहे.परंतु; सर्वच जिल्ह्यात संगणकीकृत ७/१२ चे नियमीत अद्यावतीकरण झालेले नाही. मात्र ई-चावडी व ई-फेरफार आज्ञावली वापरासाठी ७/१२ चा युनिकोड रुपांतरीत संगणीकीकृत डाटा; प्रलंबित फेरफार नोंदी संगणकात घेऊन अद्यावत करणे अनिवार्य आहे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. रा.भु.अ.आ.का.४ /युनिकोड रुपांतरण / प्र.क्र.१५ /२०१२,दिनांक १५ मार्च,२०13 व परिपत्रक क्र. रा.भु.अ.आ.का.४ / प्र.क्र.१६ /डेटा दुरुस्ती आज्ञावली/ १३, दिनांक २० मे,२०13 अन्वये दिलेल्या सुचनांनुसार ७/१२ च्या युनिकोड रुपांतरीत संगणकीकृत डाटामधील गारबेज काढुन, डाटा दुरुस्ती आज्ञावलीचा (Data corrcotion utility)वापर करुन ७/१२ चा संगणकीकृत डाटा दुरुस्त केल्यानंतर ; प्रलंबित फेरफार नोंदी संगणकात घेऊन ७/१२ चा संगणकीकृत डाटा अद्यावत करावयाचा आहे.यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख,पुणे यांनी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र पुणे यांचे मार्फत "हस्तलिखीत फेरफार नोंदवहीतील मंजुर/ नामंजुर नोंदी संगणकावर घेण्याची प्रणाली (म्युटेशन अपडेशन मॉड्युल)" विकसीत केली आहे.

राज्यातील सर्व तहसिलदार यांना वापरासाठी सदरची आज्ञावली याव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.राज्यातील सर्व जिल्हा सुचना विज्ञान अधीकारी यांनी सदरची आज्ञावली डाउनलोड करुन घेता यावी; यासाठी सदरची आज्ञावली राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या सर्व्हरवर ठेवण्यात आली आहे. तांत्रिक संचालक, राष्ट्रीय भुमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख कार्यालय पुणे यांचेकडील दिनांक ११/६/२०13 रोजीच्या ई-मेल संदेशाने सदरची आज्ञावली डाऊन लोड करुन घेण्याच्या सुचना ( प्रत सलग्न परिशिष्ठ -१) सर्व जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांना दिलेल्या आहेत. सदरची आज्ञावली डाऊन लोड करुन घेण्याबाबत तसेच आज्ञावलीच्या वापराबाबतचे सविस्तर प्रशिक्षण दिनांक १४/०६/२०13 रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे राज्यातील सर्व डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट व जिल्हा सुचना विज्ञान आधिकारी यांना देण्यात आले आहे.

सबब ७/१२ चा युनिकोड रुपांतरीत संगणीकीकृत डाटा; प्रलंबित फेरफार नोंदी संगणकात घेऊन, अद्यावत करणेबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. राज्यातील सर्व डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांनी जिल्हा सुचना विज्ञान अधीकारी यांचे मदतीने सदरची आज्ञावली डाऊनलोड करुन घेऊन त्यांच्या जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांना पुरवावी.

२. डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट व जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांनी जिल्हयातील सदर आज्ञावलींचा वापर करणा-या कर्मचा-यांना आज्ञावलींच्या वापराबाबत प्रशिक्षण द्यावे.

३. राज्यातील सर्व तहसिलदार यांनी सदर आज्ञावलीचा वापर करुन प्रलंबित फेरफार नोंदी संगणकात घेऊन ७/१२ चा संगणकीकृत डाटा अद्यावत करण्याची कार्यवाही तालुका पातळीवर करावी.

४. तहसिलदार यांनी ७/१२ च्या संगणकीकृत डाटामध्ये गावनिहाय किती फेरफार नोंदी अद्यावत करणेवर प्रलंबीत आहेत हे निश्‍चित करुन तालुका निहाय किती फेरफार नोंदी अद्यावत करण्यावर प्रलंबीत आहेत हे निश्‍चित करावे.

५. गाव निहाय अद्यावत करावयाच्या फेरफार नोंदी निश्‍चित झाल्यानंतर तहसिलदार यांनी ७/१२ चा संगणकीकृत डाटा अद्यावत करण्यासाठी गाव निहाय कार्यक्रम तयार करावा व त्याप्रमाणे गावनिहाय डाटा अद्यावत करण्याची कार्यवाही करावी.

६. त्यानंतर जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.प्र.क्र.रा.भु.अ.आ.का-४/युनिकोड रुपांतरण /प्र.क्र.१५ /२०१२ दि.१५/०३/२०१३ मधील सुचना नुसार ७/१२ च्या संगणीकीकृत डाटाचे व्हेरीफिकेशन / व्हॅलिडेशन करणे, डाटा प्रमाणीत करणे, डाटा स्टेट डेटा सेंटरवर अपलोड करणे, डाटा डिजीटली स्वाक्षरीत करणे याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

७. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्याच्या डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट यांचे मार्फत ७/१२ चा संगणकीकृत डाटा अद्यावत करण्याच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवावे. तसेच या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. रा.भु.अ.आ.का.४ /युनिकोड रुपांतरण / प्र.क्र.१५ /२०१२,दिनांक १५ मार्च,२०१३ अन्वये पुरविण्यात आलेल्या प्रपत्र क्रमांक ४ मध्ये याबाबतचा प्रगती अहवाल दरमहा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख , पुणे कार्यालयास नियमीतपणे पाठवावा.

८. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. रा.भु.अ.आ.का.४ /युनिकोड रुपांतरण / प्र.क्र.१५ / २०१२,दिनांक १५ मार्च,२०१३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ७/१२ चा संगणकीकृत डाटा अद्यावत करण्यासाठी आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांनी तहसिलदार यांना सर्व्हर, संगणक साहीत्य, ऑपरेटर, प्रिंटर इत्यादी भाडेतत्वार आवश्यक तेवढे उपलब्ध करुन द्यावेत किंवा खरेदी करुन द्यावेत. त्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख यांचे कडुन पुरविलेल्या निधीचा वापर करावा. सदरचा निधी अपुरा पडल्यास जिल्हाधिकारी यांनी सेतू निधीतून निधी उपलब्ध करुन द्यावा . जिल्हा सेतु मध्ये पुरेसा निधी उपलब्ध नसल्यास राज्य सेतू निधीमधुन निधी उपलब्ध करुन घ्यावा.

सर्व जिल्हाधिकारी यांनी ७/१२ चा युनिकोड रुपांतरीत संगणीकीकृत डाटा; सर्व प्रलंबित फेरफार नोंदी संगणकात घेऊन, अद्यावत करण्याची कार्यवाही तात्काळ पुर्ण करुन जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे कार्यालयास अहवाल सादर करावा.

( चंद्रकांत दळवी )
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : मा.अप्पर मुख्य सचिव महसुल, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : राज्य सुचना विज्ञान अधिकारी, मुंबई यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख,संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण, भूमापन,नागरी भूमापन, एकत्रीकरण, रा.भु.अ.आ.का)पुणे यांना माहितीसाठी.

प्रत : उपसंचालक भुमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : वरीष्ठ तांत्रिक संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : उपविभागीय अधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

DISPATCHED
१८४-६१-५-२०२६१
17 JUN 2013

# परिशिष्ठ -१

## (जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे यांचे कडील परिपत्रक क्र. / रा.भू.अ.आ.का.-४ /प्र.क्र.२०/ म्युटेशन अपडेशन मॉडयुल २०१३ दि.१७/०६/२०१३ चे संलग्न)

| | |
|---|---|
| Subject | Regarding Release of Mutation Updation Module |
| From | Settlement Commissioner <dlrmah.mah@nic.in> |
| Date | Tuesday, June 11, 2013 11:41 am |
| To | NIC District Centre Akola <mahako@nic.in> , NIC District Centre Washim <mahwas@nic.in> , NIC District Centre Buldhana <mahbul@nic.in> , NIC District Centre Yeotmahal <mahyav@nic.in> , NIC District Centre Amravati <mahamr@nic.in> , NIC District Centre Nagpur <mahnag@nic.in> , NIC District Centre Wardha <mahwar@nic.in> , NIC District Centre Chandrapur <mahcha@nic.in> , NIC District Centre Gadchiroli <mahgad@nic.in> , NIC District Centre Bhandara <mahbha@nic.in> , NIC District Centre Gondia <mahgon@nic.in> , NIC District Centre Aurangabad <mahaur@nic.in> , NIC District Centre Jalna <mahjal@nic.in> , NIC District Centre Hingoli <mahhin@nic.in> , NIC District Centre Parbhani <mahpar@nic.in> , NIC District Centre Osmanabad <mahosm@nic.in> , NIC District Centre Beed <mahbee@nic.in> , NIC District Centre Latur <mahlat@nic.in> , NIC District Centre Nanded <mahnan@nic.in> , NIC District Centre Nasik <mahnas@nic.in> , NIC District Centre Jalgaon <mahjag@nic.in> , NIC District Centre Ahmednagar <mahahm@nic.in> , NIC District Centre Dhulia <mahdhu@nic.in> , NIC District Centre Nandurbar <mahnad@nic.in> , NIC District Centre Poona <mahpun@nic.in> , NIC District Centre Sholapur <mahsho@nic.in> , NIC District Centre Sangli <mahsan@nic.in> , NIC District Centre Satara <mahsat@nic.in> , NIC District Centre Kolhapur <mahkol@nic.in> , NIC District Centre MumbaiCity <mahbom@nic.in> , "NIC District Centre Mumbai Suburban (Bandra)" <mahbsd@nic.in> , NIC District Centre Thana <mahtha@nic.in> , NIC District Centre Ratnagiri <mahrat@nic.in> , NIC District Centre Subdhudurg <mahsin@nic.in> , NIC District Centre Raigad <mahrai@nic.in> |
| Cc | cndalvi@yahoo.co.in , siomsu@nic.in , rane.rr@nic.in , chowsalkar.v@nic.in , sameer.d@nic.in , dearspd@gmail.com , lakshmi.pd@nic.in |

Dear All

Earlier on 05/06/2013 Data correction Utility (Enhanced version) has been released by NIC Pune along with Audit Table Creation.

Now by this time some Tehsil's in your district might have completed / near completion stage of data conversion (ISCII to UNICODE), data cleaning (Removal of Garbage / Golu), data correction by generating verification reports (nearly 14 verification reports) and making corrections according to the reports. Some of the reports may need additional functionality (Mutation Updation Module - in terms of LMIS it was referred as EDIT Module).

Now in order to update the backlog mutation entries, NIC Pune has released Mutation Updation Module and made available at NIC SDU Pune. These applications are available for download to DIOs from NIC network as per details given below :-

1. Server IP : 10.153.8.154
2. Folder to download : UC-DCU-DUM-Release with sub-folders as

2.1] Database Script

2.2] Publish-Websites

2.3] UserManual

3. user-id : nic, password : $m3llycat

Read Me.txt is available in folders 2.1] and 2.2] for using application and doing database side
activities

**We have planned to have a VC for demonstrating Mutation Updation Module, User Creation Module and discuss problems faced by you in**

**implementing the released software's possibly in this week or next week.**

**Note :**

1. Those tahsils who have already started using Data Correction Module (Enhanced) should not execute the database-scripts part again if they have not executed the scripts earlier, they should do the same now.

2. As the data conversion activity have already started it is assumed that the primary server preparation requirements viz. IIS Loading, FrameWork Installation, PostgreSQL Database Installation, availability of data etc has already been carried out.

**However if you are facing any difficulty in Server creation etc. Please let us know.**

3. For Talathi and Circle registration, Sevarth ID data has to be used, this data has yet to be received from Dept. of Accounts & Treasuries (DAT).

4. After getting data from DAT, Tehsil wise tables having Sevarth ID will be created and sent to you in form of backups to be restored Tehsil wise. The detail regarding downloading this tables etc. Will be given subsequently.

**Requested to revert back regarding any problems, suggestions for improvement during implementing NLRMP.**

With regards
Datar S.P.
TD, NLRMLP,
Office of SC & DLR Pune